सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
# सार्वजनिक आरोग्य विभाग

## आरोग्य विभागांतर्गत उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ कोल्हापूर अंतर्गत गट-क संवर्ग पदभरती २०१६ लेखी परीक्षा अंतिम उत्तरतालिका व गुणवत्ता यादीबाबत परीक्षार्थींना सुचना

**आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई** यांचे अधिपत्याखालील उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर कार्यालयातील गट-क संवर्गातील दिनांक २०/०५/२०१८ रोजी झालेल्या एकूण ९ संवर्गाच्या लेखी परीक्षेच्या वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या प्रश्नपत्रिकेच्या चारही आवृत्यांच्या (११/२२/३३/४४) उत्तरतालिका उमेदवारांचे माहितीसाठी संकेतस्थळावर प्रसिध्द करुन आक्षेप मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने प्राप्त आक्षेपांचे निराकरण करण्यात आलेले असून अंतिम उत्तरतालिका आरोग्य विभागाच्या http://arogya.maharashtra.gov.in या तसेच महाऑनलाईनच्या maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. उक्त अंतिम उत्तरतालिकेनुसार सामाईक गुणवत्ता यादया तयार करण्यात आलेल्या असून त्या देखील वर नमूद करण्यात आलेल्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

प्रसिध्द करण्यात आलेल्या सामाईक गुणवत्ता यादीमध्ये हजर उमेदवाराचे नाव समाविष्ठ नसल्यास त्याबाबतचा आक्षेप त्वरीत पुराव्यासह **caodhs.mumbai@gmail.com** / **dhsdesk5@yahoo.com** या ई-मेल पत्त्यावर गुरूवार दिनांक २५ ऑक्टोंबर, २०१८ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा रीतीने पाठवावेत. विहित कालमर्यादित पोहोचलेल्या आक्षेपांचीच फक्त दखल घेतली जाईल व त्यान्वये अंतीम निकाल प्रवर्गनिहाय गुणवत्ता यादीसह प्रसिध्द करण्यात येईल. तसेच उमेदवारांना समुपदेशन प्रक्रियेबाबत उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर कार्यालयामार्फत स्वतंत्र पत्राव्दारे कळविण्यात येईल.

सहपत्र : १) अंतिम उत्तरतालिका
२) सामाईक गुणवत्ता यादी

ठिकाण : मुंबई
दिनांक : १८/१०/२०१८

आयुक्त, आरोग्य सेवा,
मुंबई

Scanned with CamScanner